पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
जा.क्र.नासुके/१/कावि/ ६६६. /२०१३
दि. २७/९/२०१३

**विषय :- ना हरकत दाखले / परवाने बाबत. . .**

<u>परिपत्रक</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रामार्फत नागरिकांना विविध प्रकारचे दाखले / परवाने विहित कालावधीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतात. सदर दाखले / परवाने साठी अर्ज, आवश्यक असणारे कागदपत्रे इ. संबंधित विभागांनी निर्धारित केली आहे. त्यासाठी नागरी सुविधा केंद्रात आवश्यक संगणक प्रणाली प्रस्थापित करुन कामकाज सुरु करणेत आलेले आहे. नागरी सुविधा केंद्रात अर्ज केल्यानंतर आवश्यक ते शुल्क स्वीकारुन टोकन क्रमांक देण्यात येतात. तद्‌नंतर अर्ज पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागास पाठविण्यात येतात. दाखले / परवाने साठी अर्ज स्वीकारणे, व तयार होऊन आलेले दाखले / परवाने वितरित करणेसाठी पीपीपी तत्वावर बाह्य संस्थेस प्रती ट्रान्झॅक्शन दराने कामकाज देणेत आलेले आहे.

महापालिकेच्यावतीने करणेत येणा-या विविध योजना, प्रकल्प इ.साठी काही दाखले / परवाने हे मनपाच्या इतर विभागांकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक असते. त्यासाठी संबंधित विभाग दाखले / परवाने मोफत घेण्यासाठी नागरी सुविधा केंद्राकडे अर्ज करीत आहेत. नागरी सुविधा केंद्रात दाखले, परवाने नि:शुल्क देण्याची कार्यवाही होत नसल्याने असे अर्ज नागरी सुविधा केंद्रामध्ये स्वीकारले जात नाहीत.

सबब या परिपत्रकाव्दारे सर्व विभाग प्रमुखांना सूचित करण्यात येते कि, त्यांचेकडील विविध योजना, प्रकल्प, कार्यालय, इ. साठी अन्य विभागांकडून लागणारे सर्व प्रकारचे दाखले / परवाने तातडीने उपलब्ध होण्यासाठी संबंधित विभागाकडे थेट पत्र्यव्यवहार करुन दाखले / परवाने प्राप्त करुन घ्यावे व संबंधित विभागांनी आपल्या विभागाकडील ना हरकत दाखले / परवाने तातडीने उपलब्ध करुन द्‌यावेत. महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागासाठीचे दाखले / परवाने साठी अर्ज मनपाच्या कोणत्याही नागरी सुविधा केंद्रात स्वीकारले जाणार नाही याची सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांनी नोंद घ्यावी.

(डॉ.श्रीकर परदेशी)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व विभागप्रमुख,
विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

प्रत,

१) मा.अति.आयुक्त कक्ष.